| MHSO200013342025 | **नियमित दिवाणी दावा क्र. २६२/२०२५** |
| --- | --- |

## निशाण क्र. १४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत व म्हणणे स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात प्रतिवादी यांचे कथन असे आहे की, सदरील प्रतिवादी हे वयस्कर व आजारी असल्यामुळे दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामूळे व त्यांची आर्थिक परीस्थीती हालाखीची असल्याने त्यांना कागदपत्रे घेऊन वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. त्यामूळे, त्यांचेविरुध्द विनाकैफीयतचा आदेश पारीत झालेला आहे. सदर दाव्याचे काम गुणदोषावर चालण्यासाठी व नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने सदरकामी झालेला विना कैफीयतचा आदेश सेट असाईड होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा येऊन त्यांना त्यांचे हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा असून सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी ते वयस्कर व आजारी असल्यामुळे दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामूळे व त्यांची आर्थिक परीस्थीती हालाखीची असल्याने त्यांना कागदपत्रे घेऊन वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्ट्यार्थ त्यांनी नि.क्र. १५ वर शपथपत्र

दाखल केलेले आहे. अर्जात नमूद असलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द होणे हे न्यायाचे ठरेल. जर प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करुन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. प्रतिवादी यांनी त्यांची कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी नि.क्र.१२ वर अर्ज दाखल केला असून तो अर्ज या न्यायालयाने आजरोजी मंजूर केला आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी नि.क्र.१२ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी नि.क्र.१२ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत व म्हणणे स्वीकारण्यात येईल.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.10.31 17:16:31 +0530

दिनांक – ३१/१०/२०२५.

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ३१/१०/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ३१/१०/२०२५ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०१/११/२०२५ |